**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन व अपात्र अतिक्रमकांचे निष्कासन यावर सनियंत्रण करण्यारीता समितीचे पुनर्गठण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी ०४.२५/प्र.क्र.१०२/फ-१**
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
तारीख: १० एप्रिल, २०२६

**संदर्भ :-**

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये मा. न्यायालयाने दिलेले आदेश दिनांक ०७.०५.१९९७.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक ०८.१३/प्र.क्र. ३०१/फ-१, दिनांक २८.०१.२०१४.
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. ४८/२०२३ व रिट याचिका क्रमांक ३०५/९५ मधील अवमान याचिका क्र.९२३७/२०२३ यांच्या एकत्रित सुनावणीमधील मा. न्यायालयाने दिलेले आदेश दिनांक १४.०१.२०२५
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्युएलपी २४.२०५/प्र.क्र. १०२/फ-१, दिनांक ०९.०४.२०२५.

**प्रस्तावना:-**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमणाबाबत मुंबई एनव्हायर्नमेंटल ॲक्शन ग्रुप यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने विविध आदेश पारीत केले असून, त्यामधील दिनांक ०७.०५.१९९७ रोजीच्या आदेशान्वये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दिनांक ०१.०१.१९९५ पूर्वीच्या अतिक्रमकांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन करण्याचे निर्देश दिले होते.

तद्नंतर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमकांच्या पुनर्वसनाबाबत सम्यक जनहित सेवा संस्था यांनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.४८/२०२३ दाखल केली आहे. दरम्यानच्या काळात कन्झरर्वेशन ॲक्शन ट्रस्ट यांनी देखील मा. उच्च न्यायालय येथे अवमान याचिका क्रमांक ९२३७/२०२३ (लॉजींग नंबर) दाखल केली असून तीची सुनावणी जनहित याचिका क्रमांक ४८/२०२३ सोबत एकत्रितरित्या सुरु आहे.

सदरच्या दोन्ही याचिकांच्या एकत्रित सुनावणी दरम्यान दिनांक १४.०१.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांच्या पुनर्वसनाबाबत व अपात्र अतिक्रमणांच्या निष्कासनाबाबत कालबध्द कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक २५.०२.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांच्या पुनर्वसनाच्या व अपात्र अतिक्रमणांच्या निष्कासनाच्या प्रक्रियेवर करण्याकरिता संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. तथापि, अतिक्रमकांची पात्रता निश्चिती करणे, मा. उच्च न्यायालय, मा. मुख्यमंत्री महोदय व उच्चाधिकार

समितीच्या निर्देशांच्या अनुपालनार्थ कार्यवाही करण्याकरीता सदर समितीच्या पुनर्गठणाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनीवरील अतिक्रमकांची पात्रता निश्चिती करणे, अतिक्रमण निष्कासन व अपात्र अतिक्रमकांचे निष्कासन पुनर्वसन करण्याकरिता मुंबई उपनगर जिल्हयातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्राकरिता व ठाणे जिल्हयातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्राकरिता खालीलप्रमाणे नमुद दोन वेगवेगळया समित्या गठीत करण्यात येत आहेत.

**१. मुंबई उपनगर जिल्ह्यातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्राकरिता समिती**

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | उप संचालक (दक्षिण), बोरीवली, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | अध्यक्ष |
| २ | उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण निर्मूलन), मुंबई उपनगर किंवा संबंधित उप जिल्हाधिकारी | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | सहायक वनसंरक्षक (दक्षिण), बोरीवली, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | सदस्य सचिव |

**२. ठाणे जिल्ह्यातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्राकरिता समिती**

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | उप संचालक (उत्तर), येऊर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | अध्यक्ष |
| २ | उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण निर्मूलन), ठाणे किंवा संबंधित उप जिल्हाधिकारी | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | सहायक वनसंरक्षक (उत्तर), येऊर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | सदस्य सचिव |

सर्व संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अतिक्रमकांचा तपशिल उपरोक्त नमूद समितीसमोर सादर करावा. सदर समितीने प्रस्तुत प्रकरणातील मा. उच्च न्यायालयाचे आदेश तसेच शासनाकडून प्राप्त निर्देशानुसार अतिक्रमकांची पुनर्वसनासाठीची पात्रता व अपात्रता ठरविण्याचे कामकाज तात्काळ सुरु करावे. समितीव्दारा पात्रता निश्चिती झाल्यानंतर पात्र अतिक्रमकांना सदनिका वाटप करण्यासाठीचे आदेश, संबंधीत उप संचालक यांनी तयार करुन ते स्वाक्षरीसाठी वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्याकडे सादर करावेत.तसेच समितीव्दारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा दरमहा अहवाल वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचेकडे सादर करावा.

संबंधित अतिक्रमणधारक अथवा अन्य व्यक्ती/पक्ष समाधानी नसल्यास हे वरील समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून १५ दिवसांत तक्रार निवारण समितीकडे (Grievance Redressal Committee) अर्ज/तक्रार दाखल करु शकतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०२६०४१०१४४९५८०१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने प्रमाणित करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

UDAY CHANDRAKANT
DHAGE

Digitally signed by UDAY CHANDRAKANT DHAGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=d50c7e8b1126d276bbe49105f9d24fff67dc9032e4afab15f5d0d94a0ea6cf5a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=097E903F6E5707A0A9A3CDAEBE40C9235E8FDA1EE2C8C4EA7713D6497937DCED, cn=UDAY CHANDRAKANT DHAGE
Date: 2026.04.10 14:50:53 +05'30'

**(उदय ढगे)**
**विशेष कार्य अधिकारी**
**महसूल व वन विभाग.**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्र्यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्र्यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, गृह निर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई
१०. वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई
११. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर/ठाणे
१२. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई
१३. अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण निर्मूलन), मुंबई
१४. सर्व संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी.